**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 6 | Feb 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *रामभाऊ रुईकरांचे फॉरवर्ड ब्लॉक पक्षातील योगदान*

*प्रकाश आर शेन्डे , पुरुषोत्तम सं. माहोरे*

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर.

***सांराश :***

इ.स. १९२०च्या नागपूर कॉंग्रेस अधिवेशनापासून रामभाऊंच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्याला सूरवात झाली. महात्मा गांधींच्या असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ यामध्ये रामभाऊंनी सहभाग घेतला. कामगार चळवळीसोबतच स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतल्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरूंगवास भोगावा लागला. सुभाषचंद्र बोसाच्या विचारसरणीमुळे रामभाऊ आकर्षित झाले. दोघांनीही कामगार चळवळीत सोबतच कार्य केले. महात्मा गांधीशी झालेल्या वैचारिक मतभेदामुळे सुभाषबाबुंनी फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केल्यावर रामभाऊ फॉरवर्ड ब्लॉक पक्षात कार्य करू लागले.

***महत्वपूर्ण शब्द–***

फॉरवर्ड ब्लॉक, सुभाषीष्ट, मार्क्सशीष्ट, ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस.

***प्रस्तावना :***

महात्मा गांधीशी झालेल्या वैचारिक मतभेदामुळे इ.स. १९३९ च्या त्रिपुरा अधिवेशनानंतर सुभाषबाबूंनी २९ एप्रिल १९३९ ला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि ३ मे १९३९ मध्ये कलकत्याला एका भव्य मोर्चाचे आयोजन करून त्याठिकाणी जनतेसमोर फॉरवर्ड ब्लॉक पक्षाची स्थापना केली त्या प्रसंगी ते म्हणाले ज्यांना या पक्षात सहभाग घ्यावयाचा असेल त्यांना परत मागे वळून पाहता येणार नाही. सहभाग घेणाऱ्याला आपले बोट कापून रक्ताने प्रतिज्ञापत्रावर सही करावी लागेल.१ विशेष म्हणजे यावेळी सतरा तरूण मुली पुढे आल्या व त्यांनी प्रतिज्ञापत्र भरले आपली भूमिका जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी १९३९ च्या ऑगस्ट महिण्यात सुभाषबाबूंनी 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचे वृत्तपत्र सुरू केले आणि भारत दौऱ्याला सुरवात केली. दुसऱ्या महायुध्दात हिटलरच्या पोलंडवरिल आक्रमणाच्या संदर्भाने १३ सप्टेंबर १९३९ रोजी नागपूरच्या सभेत त्यांनी सांगितले की "पोलंडवरिल राजवट निम-फॅसिस्ट असली तरी जर्मनिने त्या देशावर आक्रमण केलेले असल्यामुळे आपल्याला पोलंडबद्दल सहानभूती वाटते २ युध्दामुळे ब्रिटन अडचणित सापडले आहे तीच आपली संधी समजून आंदोलन सुरू करावे" असे सूभाषबाबुंना वाटत होते. हे जनआंदोलन अहिंसकच असले पाहीजे असा त्यांनी कधिच आग्रह धरला नव्हता अहिंसक प्रतिकार हे सुभाषबाबूंच्या दृष्टीने तत्व नसून ते एक सोयीचे धोरण होते आणि त्याचा अवलंब करणे व्यावहारिक दृष्टया आवश्यक वाटल्यास करण्याची त्यांची तयारी होती यामागचा उद्देश एकच होता तो म्हणजे स्वातंत्र्य.

रामभाउंचा जन्म ८ जानेवारी १८९५ ला कोल्हापूर जिल्हातील रूई या गावी सखारामपंत रूईकरांच्या घरी झाला. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला व पदवी पर्यंतचे शिक्षण पुण्याच्या फर्गुसन महाविद्यालयात झाले. त्यांनी नागपूर विद्यापीठातून एम. ए. इतिहास व अर्थशास्त्राची पदवी प्राप्त केली. कायदायाची आवड असणाऱ्या रामभाउंनी अलाहाबाद विद्यापीटातून कायदयाची परीक्षा उत्तीर्ण केली. विवाहानंतर नागपूरला स्थायीक झाल्यावर इ.स. १९२० च्या कॉंग्रेसच्या नागपूर अधिवेशनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

स्वातंत्र्य चळवळीची मशाल हाती घेणाऱ्या रामभाउंवर सुरवातीपासूनच लोकमान्य टिळकांच्या जहाल

विचारसरणीचा प्रभाव होता. त्यामुळे रामभाऊ सुभाषबाबूंच्या प्रखर राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित झाले. कामगार क्षेत्रातील रामभाऊंच्या कार्यामुळे दोघांचे निकट संबध आले ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या इ.स. १९३१च्या कलकत्ता अधिवेशनाचे सुभाषबांबू अध्यक्ष होते तर इ.स. १९३२च्या अधिवेशनाचे अध्यक्ष रामभाऊ होते. ३ पुढे हे संबध असेच वृध्दीगंत होत राहीले. फॉरवर्ड ब्लॉकच्या स्थापनेनंतर पांडुरंग महादेव बापट ऊर्फ सेनापती बापट या स्वातंत्र्य वीरांची भव्य सभा रामभाऊंच्या अध्यक्षतेखाली ११ ऑक्टोंबर १९३९ ला नागपूरच्या प्रसिध्द चिटणविस पार्क मध्ये आयोजित करण्यात आली. या सभेत सेनापती बापटांनी लाल रंगाचा झेंडा काढून म्हटले की " या झेंडयावरिल हातोडा आणि कोयता माझे आदर्श आहेत " त्यानंतर त्यांनी युनियन जॅक काढून म्हटले " मी आतापर्यंत या झेंडयाचा आदर करित होतो कारण हा लोकशाही व स्वातंत्र्यांचे प्रतिक होता परंतू आता हा झेंडा साम्राज्यवादाचे प्रतिक आहे म्हणून या झेंडयाला जाळलाच पाहिजे. " त्यांनी लगेच युनियन जॅकला आग लावली व सर्वांनी "इन्कलाब जिंदाबाद" अश्या घोषणा दिल्या. ४

फॉरवर्ड ब्लॉक पक्षाची पहिली अखिल भारतीय परिषद १८ ते २२ जून १९४० ला नागपूरला आयोजित करण्यात आली.५ या परिषदेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष रामभाऊ होते.६ याप्रसंगी आपल्या अध्यक्षिय भाषणाते सुभाषबाबू म्हणाले "माझा पहिला प्रश्न तुम्हा सर्वांसमोर हा आहे की आपली काम करण्याची पध्दती ही आपल्या धोरणशी सूसंगत आहे का ? देशाच्या दृष्टीने आम्ही केलेली फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना योग्य आहे? आणि याला माझे असे उत्तर आहे निश्चितच होय". तर स्वागत समितीचे अध्यक्ष रामभाऊ म्हणाले "मी अध्यक्ष आणि सर्व उपस्थित प्रतिनिधीचे आभार माणतो व अतिशय कमी वेळात नागपूर शहरातील जनतेने ही परिषद यशस्वी करण्यासाठी जे सहकार्य केले याबद्दल त्यांचेही आभार माणतो.७ पूढे म्हणाले आम्हाला आंतरराष्ट्रीय परिस्थीतीचे काही देणे नाही. आम्हाला पाहिजे ते स्वातंत्र्य यावेळी त्यांनी लोकांना टिळकांच्या वाक्याची आठवण करून दिली ' ब्रिटीशांची अडचण ही भारतासाठी सुवर्ण संधी आहे ' जर काँग्रेस आणि गांधीजी त्वरीत सरळ आक्रमणाचा निर्णय घेत असतील तर आम्ही त्यांच्या पाठीमागे आहोत आम्ही गांधीजीवर प्रेम करतो, आम्ही काँग्रेसवर प्रेम करतो पण त्याहीपेक्षा आमचे प्रेम भारतावर आहे".८ या अधिवेशनानंतर सुभाषबाबूंची नागपूरात हत्तीवर बसवून भव्या शोभायात्रा काढण्यात आली त्यावेळी किसान सभेचे स्वामी सहजानंद व देशातील अनेक गणमाण्य व्यक्ती उपस्थित होते. ९

इ.स. १९४०च्या नागपूर अधिवेशनानंतर मध्यप्रांताच्या संगठणाची संपूर्ण जबाबदारी सुभाषबाबूंनी रामभाऊवर सोपविली होती. रामभाऊंनी फॉरवर्ड ब्लॉक पक्षात अनेक पद भुषविली होती. महात्मा गांधी सेवाग्राम आश्रमात असतांना रामभाऊ व मुंकुदलाल सरकार यांनी महात्मा गांधीचे सुभाषबाबूंच्या निर्णयाच्या संदर्भात विचार ऐकण्यासाठी ३० मार्च १९४१ ला मुलाखत घेतली.१० रामभाऊंना मध्यप्रांतात फॉरवर्ड ब्लॉकचे कार्य पूर्ण करतांना डॉ. शिवाजीराव पटवर्धन, ह. वि. कामथ, वासुदेवराव सुभेदार, प्र.के तारे, ल.मा. वखरे, सत्यनारायन बजाज, डॉ. मुजुमदार या सारख्या सुभाषबांबूच्या विचारावर ठाम असणाऱ्या सहकाऱ्यांची साथ लाभली. प्र.के. तारे लिहतात "रामभाऊनीं मला सांगितले होते की जानेवारी १९४१ मध्ये त्यांना नेताजीकडून एक सांकेतीक संदेश भविष्यातील 'इंडियन नॅशनल आर्मीशी संबधित प्राप्त झाला होता. तो गुप्त सांकेतीक संदेश मी फॉरवर्ड ब्लॉकच्या भूमिगत नेत्यांपर्यत पोहचविला होता". ११

या काळात टाईम्स ऑफ इंडियाने व ब्रिटीश सरकारच्या सचिवाने सुभाषबांबूवर पोरकटपणे आरोप केला होता की ते देशद्रोही आहेत त्यावेळी रामभाऊंनी शार्दुलसिंग कवि८वर यांच्या अध्यक्षतेखाली फॉरवर्ड ब्लॉकची सभा बोलविली व आपल्या सहकाऱ्यांसमोर प्रस्ताव ठेवला की आपण या आरोपाला उत्तर दिले पाहिजे. त्यासाठी सुभाषबाबुंच्या फोटोवर भारतमाता आशिर्वाद देत आहे व नेताजींना तारणहार असे दाखविण्यात आले अशी पत्रके छापून मोठया शहरात वाटण्यात आले. पंडित नेहरूनी सुभाषबाबूंनी जापान्यांच्या मदतिने भारतावर आक्रमण केले तर मी त्यांचा विरोध करिण असे म्हटले तेव्हा अलाहाबादच्या फॉरवर्ड ब्लॉक शाखेने एका सभेचे आयोजन करून सभेत आपले विचार मांडण्यासाठी पंडित नेहरूनां बोलाविले पण ते आले नव्हते. याच संदर्भात विचार व्यक्त करण्यासाठी मुंबईच्या चौपाटीवर एका सभेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी एक लाखापेक्षा जास्त लोक सहभागी झाले होते. या सभेत विघ्न निर्माण करण्यासाठी साम्यवादयांनी शेजारी सभा घेतली. त्यांची सभा सफल होत नाही हे पाहून त्यांनी फॉरवर्ड ब्लॉकच्या सभेत घुसून 'सुभाषबाबू गद्दार है' असे नारे लावले त्यावेळी काही साम्यवादांना पकडण्यात आले तर काही पळून गेले नंतर टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमाणपत्राच्या काही प्रती व युनियन जॅक अमरावतीच्या शिवाजीराव पटवर्धनांनी सार्वजनिकरित्या जाळला. यावेळी श्री बिदेश कुलकर्णी व रामभाऊंनी उत्सुफर्तपणे भाषणे दिली. १२ याप्रसंगी रामभाऊ म्हणाले "साम्रज्यवादाचे दिवस आता थोडे राहिले आहे आणि भारतीय स्वातंत्र्याचा सुर्य सुभाषबाबूंच्या नेतृत्वात उदय होत आहे ".१३

सुभाषचंद्र बोसांनी संघटीत केलेल्या आझाद हिंद सेनेत सहभाग घेतलेले कॅप्टन किरडे व शेख मुसा यांची भेट झाल्यावर रामभाऊंनी या दोन्ही स्वातंत्र्य वीरांचा बाबासाहेब कोथळकर या कामगार नेत्याच्या अपस्थितीत भव्य सत्कार केला. कॅप्टन कीरडेच्या सूचनेप्रमाणे रामभाऊंच्या मार्गदर्शनाखाली ५ सप्टेंबर १९४५ रोजी गिरणी मजूर संघाच्या कार्यालयात केवळ पाच तरूण कामगारांच्या सहकार्याने आझाद हिंद दलाची स्थापना केली.१४ दुसरे विश्वयुध्द संपल्यावर फेब्रुवारी १९४६ मध्ये फॉरवर्ड ब्लॉकच्या वतिने रामभाऊंनी अखिल भारतीय

कामगारांची परिषद जबलपूर येथे आयोजित केली. या परिषदेत फॉरवर्ड ब्लॉक कामगार कायदेमंडळाची स्थापना करण्यात आली. १५

ब्रिटीश सरकारणे फॉरवर्ड ब्लॉक पक्षाच्या क्रांतीकारी कार्यामुळे या पक्षावर ऑगस्ट १९४२ मध्ये बंदी घातली व भारतातील फॉरवर्ड ब्लॉकची सर्व कार्यालये बंद करण्यात आली. सुभाषबाबूंच्या विमान दुर्घटनेनंतर जून १९४६ मध्ये फॉरवर्ड ब्लॉक पक्षावर घातलेली बंदी अठविण्यात आली. १० जूनला फॉरवर्ड ब्लॉकच्या कार्यकारी समितीची बैठक बोलविण्यात आली. या समितीत खालीलप्रमाणे सदस्य होते. सुभाषचंद्र बोस ( संस्थापक अध्यक्ष ) एस. एस. कविश्वर (अध्यक्ष) आर. एस. रुईकर, (उपाध्यक्ष) शिलभद्र याजी, (उपाध्यक्ष) हरी विष्णू कामत,(मुख्य सचिव) मुकुंदलाल सरकार, विश्वंभरदयार त्रिपाठी, राजमनार चिटटी, सत्यनारायन बजाज ( सचिव).

हिंदुस्थानच्या विभाजनानंतर फेब्रुवारी १९४८ मध्ये फॉरवर्ड ब्लॉकच्या केंद्रिय समितीची बैठक वाराणसी येथे झाली. या बैठकीत फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे दोन गटात विभाजन झाले. मार्क्सवादी गटाचे नेतृत्व शिलभद्र याजी यांचकडे तर सुभाषष्टि गटाचे नेतृत्व रामभाऊ कडे आले. रामभाऊंनी सुभाषष्टि फॉरवर्ड ब्लॉकचे अधिवेशन २९ ते ३१ डिसेंबर १९४८ ला चंद्रनगर (बंगाल)येथे आयोजित केले. रामभाऊंनी सुभाषबाबूंच्या विचारांवर 'आयडिओलॉनी ऑफ नेताजी' या फॉरवर्ड ब्लॉक तर्फे २ जून १९४९ ला प्रकाशित पुस्तकाची प्रस्तावणा लिहली त्या प्रस्तावणेत ते म्हणतात " माझे मित्र डॉ. अतिन्द्रनाथ बोस यांनी मला नेताजीच्या विचारधारेवर आधारित पुस्तक छापून त्याची प्रस्तावना मी लिहावी अशी विनंती केली. मी माझ्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षातील कार्यकर्त्यांनाच नव्हे तर या देशावर प्रेम करणाऱ्या सर्व भारतीयांना विनंती करतो की त्यांनी हा ग्रंथ वाचावा, भारतामध्ये समाजवाद स्थापीत करू इच्छिणाऱ्या क्रांतीकारकांना हा ग्रंथ प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल".१६ सुभाषबाबूंच्या विचारावर नितांत प्रेम करणाऱ्या रामभाऊने देशसेवेसोबतच कामगार चळवळीच्या माध्यमातून समाजसेवेचेही व्रत स्वीकारले होते.

***संदर्भ–***


१) *Ghosh Ashok, A Short History of All Indian Forward Block Lokmat Publication Kolkata, 2006, Page- 29-30.*

२) फडके. य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड – ४ श्री विद्या प्रकाशन पूणे, १९९३ पृष्ठ १८२

३) *Gupta Prem sagar, A short History of All India trade union congress , AITUC Publication Delhi 1980.p- 140*

४) *Vidarbha Archives Political and Military Department file no. 651 ,95-1939 p-3*

५) *Ghosh Ashok, A Short History of All Indian Forward Block Lokmat Publication Kolkata, 2006, Page- 32.*

६) *Netaji Institute for Asian studies Kolkata Netaji senetary p- 22*

७) *Bose S.C, Struggle for Indian Independence: Subhash Chandra Bose , Netaji Institute for Asian studies Kolkata 1996*

८) *Netaji Institute for Asian studies Kolkata Netaji senetary vol p- 22*

९) *Ruikar Malti, Rambhau Ruikar Senetary sovienuir-1995, p 26*

१०) *collected works of Mahatma Gandhi volume -80, p- 482*

११) *Ruikar Malti, Rambhau Ruikar Senetary sovienuir 1995, Ruikar srmuti samiti Nagpur ,p- 02*

१२) *Subhash Chandra bose : facts of great patriot Netaji , Netaji Institute for Asian studies 1996 p-5*

१३) *Ruikar Malti Ruikar Senetary sovienuir Ruikar srmuti samiti, Nagpur p- 26*

१४) खोडके ज. पा. आझाद हिंद सेनेचे कॅप्टन किरडे, नभ प्रकाशन, अमरावती .२००८ पृ– ९९

१५) *Ghosh Ashok, A Short History of All Indian Forward Block Lokmat Publication Kolkata, 2006, Page- 42-43.*

१६) *Ideology of Netaji 1949, forward block publication Kolkata preamble*